# जपानच्या उच्चाधिकाऱ्यांची बीकेसी मेट्रो स्थानकाला भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा ते आरे मेट्रो ३ मार्गिकेवरील बीकेसी स्थानकाला जपानच्या हाउस ऑफ कौन्सिलर्सच्या सदस्यांनी रविवारी भेट दिली. या भेटीत जपानच्या उच्चाधिकाऱ्यांनी बीकेसी ते मरोळ असा प्रवास मेट्रो ३ मधून केला. तसेच कामांची पाहणीही केली. यावेळी जपानच्या हाउस ऑफ कौन्सिलर्सचे सदस्य काझुहिको ओकी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळात तैगा इशिकावा, कानेशिगे वाकामात्सू, एमएमआरसीचे प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता, नियोजन विभागाचे संचालक आर. रमना, सिस्टम विभागाचे संचालक राजीव यांच्यासह जपानचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



■ ही मेट्रो मार्गिका मुंबईसाठी गेम चेंजर ठरणार असून वाहतुकीची समस्या कमी होण्यास मदत होणार आहे, असे यावेळी एमएमआरसीच्या अधिकाऱ्यांनी नमूद केले. या मेट्रो मार्गिकेसाठी जपानच्या जायका या वित्त संस्थेने कर्ज दिले आहे. त्यामुळे या मेट्रो मार्गिकेच्या कामांबाबत जपानच्या हाउस ऑफ कौन्सिलर्सच्या सदस्यांनी समाधान व्यक्त केले, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.